सोमवार, दि. २ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १८१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाचा प्रश्न मार्गी लागला

### आ अर्जुनराव खोतकर यांच्या पाठपुराव्याला यश

### जिल्हा नियोजन समितीमधून २ कोटी ५ लाखांढचा निधी मंजूर

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या अग्निशामक दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. अपुऱ्या व निकृष्ट सुविधांमुळे कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत होते. तातडीच्या सेवेत कार्यरत असलेल्या अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांना सुरक्षित व सुसज्ज निवासस्थानाची आवश्यकता अत्यंत महत्त्वाची असल्याने हा प्रश्न गंभीर बनला होता.

या पार्श्वभूमीवर आमदार अर्जुनराव खोतकर यांनी पुढाकार घेत पालकमंत्री पंकजाताई मुंडे तसेच जिल्हाधिकारी आसिमा मित्तल यांच्याकडे जिल्हा नियोजन समिती अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याची ठोस मागणी केली होती. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी बैठका घेऊन या प्रश्नाची गांभीर्याने मांडणी केली व तातडीने निर्णय घेण्याची विनंती केली होती.

आमदार खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तब्बल दोन कोटी पाच लाख रुपयांचा निधी मंजूर केला.



जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनीही या प्रस्तावास मान्यता देत आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तत्परता दाखवली. मंजूर निधीमुळे अग्निशामक दलाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज व सुरक्षित निवासस्थाने उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या निर्णयामुळे अग्निशामक दलातील कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आपत्कालीन परिस्थितीत २४ तास सज्ज असणाऱ्या या दलाच्या कर्मचाऱ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध होणे ही अत्यावश्यक बाब असल्याचे मत व्यक्त होत आहे. नव्या निवासस्थानांमुळे त्यांच्या कार्यक्षमता व मनोबलातही निश्चितच वाढ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, निधी मंजूर करून प्रश्न मार्गी लावल्याबद्दल आमदार अर्जुनराव खोतकर यांनी पालकमंत्री पंकजाताई मुंडे व जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे मनःपूर्वक आभार मानले. जिल्ह्याच्या विकासासाठी व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### जालना मतदारसंघातील जनहिताच्या प्रश्नांसाठी विधानसभेत आवाज

## आमदार अर्जुनराव खोतकर यांचा भव्य सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, नागरिक आणि सर्वसामान्यांच्या ज्वलंत प्रश्नांना प्रभावीपणे महाराष्ट्र विधानसभेत मांडून सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल आमदार अर्जुनराव खोतकर यांचा विविध सामाजिक संस्था, शेतकरी संघटना आणि नागरिकांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी खोतकर यांनी मतदारसंघातील प्रश्नांवर घेतलेली भूमिका ही जनतेच्या हिताची आणि विकासाभिमुख असल्याचे गौरवोद्गार काढले.

विधानसभेत मांडलेले महत्त्वाचे प्रश्नांमध्ये कापूस खरेदी मुदतवाढ - कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बाजारभावातील चढ-उतार आणि खरेदी प्रक्रियेतील विलंबाचा मोठा फटका बसत असल्याने शासनाने खरेदीची मुदत वाढवून सर्व शेतकऱ्यांचा माल हमीभावाने खरेदी करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. सोयाबीन खरेदी मुदतवाढ - खरेदी केंद्रांवरील तांत्रिक अडचणी आणि वेळेअभावी अनेक शेतकऱ्यांना अडथळे येत असल्याने सोयाबीन खरेदी कालावधी वाढवून दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

मका खरेदी केंद्रांची संख्या वाढविणे - मका उत्पादक शेतकऱ्यांना लांब अंतरावर जावे लागत असल्याने अतिरिक्त खरेदी केंद्रे सुरू करून वेळ व खर्च वाचवावा, अशी मागणी मांडण्यात आली.

अवैध सावकारीला आळा - ग्रामीण भागात वाढत्या अवैध सावकारीमुळे शेतकरी व गरजू नागरिक आर्थिक संकटात सापडत असल्याने कडक कारवाई करून या प्रथेवर लगाम घालण्याची मागणी करण्यात आली.

जलपुरवठा योजनांसाठी निधी व कामे पूर्ण करणे - पाणीपुरवठा योजनांना पुरेसा निधी उपलब्ध करून प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत, जेणेकरून प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ पाणी पोहोचेल, यासाठीही जोरदार पाठपुरावा करण्यात आला.

शहर विकास व भूमिगत गटार योजना - शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी केंद्राच्या शहरी विकास योजनेत जालना शहराचा समावेश करून भूमिगत गटार योजना प्रभावीपणे राबवावी, अशी मागणी ठामपणे मांडण्यात आली.

या मागण्यांमुळे मतदारसंघातील शेतकरी, व्यापारी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. जनतेच्या प्रश्नांवर ठामपणे भूमिका मांडणारे नेतृत्व मिळाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

या सत्कार कार्यक्रमाला शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सहभाग होता.

उपस्थित मान्यवरांनी पुढील काळातही मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी अशाच ताकदीने आवाज उठवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. एकूणच, जालना मतदारसंघातील मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देत विधानसभेत सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, विकासाच्या दिशेने सकारात्मक पाऊल म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.


युवा आदर्श

### मूळ पक्ष ...

**ईडीची पेटवी बिडी**
**गुपचूप मारता पीन**
**दिवाघासण्याआधि**
**का प्रकट होई जीन**
**मिळकती हून जादा**
**भरत राहिले फाईन**
**सामिल होई तिकडे**
**उपाय सुपर फाईन**
**जाहीरपणे खंडणी**
**झकास बिट कॉईन**
**बेनामी संस्थे देणगी**
**नामानिराळा राहीन**
**विना शर्ट पाठिंबा रे**
**मसुद्या करावे साईन**
**अधून मधून विरोधी**
**घोळक्यां होई जॉईन**
**माहीत नव्हते इकडे**
**अधिक सुवर्णमाईन**
**शुष्क घोषणा बाजी**
**रे आता गोडवे गाईन**
**कसे करावे पक्षांतर**
**केवढी मोठी लाईन**
**अवघड होणे प्रवेश**
**पुन: मूळपक्षाजाईन**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## कृत्रिम बुद्धिमत्ता पतसंस्था आणि बँकिंग क्षेत्रात ठरत आहे क्रांतिकारी -सचिन वाणी



**जालना । प्रतिनिधी -** कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय पतसंस्था आणि बँकिंग क्षेत्रात अत्यंत क्रांतिकारी ठरत आहे. एआय अल्गोरिदम्स अनियमित व्यवहार ओळखून फ्रॉड टाळण्यात मदत करतात त्यामुळे पतसंस्थेचे सुरक्षितता वाढते. त्यामुळे बँकिंग क्षेत्राने आपल्या कामकाजात एआयचा वापर वाढविणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रियदर्शनी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन वाणी यांनी येथे बोलताना केले.

सहकार भारतीच्यावतीने पतसंस्थांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता वापर या विषयावर प्रियदर्शनी बँकेत आयोजित चर्चासत्रात श्री. वाणी बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशनचे खजिनदार दादाराव तुपकर होते. श्री. वाणी **पान २ वर**

## जैन फईम शेख याचा वयाच्या आठाव्या वर्षी १३ तासाचा अकरावा रोजा; कुटुंबियाकडून कौतूक

**जालना । प्रतिनिधी -** पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली असून, मुस्लिम बांधव मोठ्या श्रद्धेने उपवास (रोजा) ठेवतत आहेत. मात्र, सध्याच्या वाढत्या उन्हाचा तडाखा मोठ्यांनाही घाम फोडत असताना, राहणार अल हणीफ मजीद येथील एका आठ वर्षांच्या चिमुकल्याने आपल्या जिद्दीच्या जोरावर आयुष्यातील अकरावा रोजा यशस्वीपणे पूर्ण केला आहे. फईम शेख यांचा सुपुत्र जैन फईम शेख याच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



रविवारी रमजान महिन्याचा अकरावा रोजा होता. अवघ्या आठ वर्षांच्या जैन फईम शेख पहाटेपासूनच रोजा धरण्याचा निश्चय केला. सकाळपासून ते सायंकाळी इफ्तारपर्यंत, म्हणजेच सलग १३ तास अन्नाचा एक कणही न घेता आणि पाण्याचा थेंबही न पिता जैन ने हा रोजा पूर्ण केला. लहान वयात दाखवलेली ही धार्मिक निष्ठा आणि संयम पाहून नातेवाईक थक्क झाले आहेत.

जैन शेख ने आपला अकरावा रोजा पूर्ण करताच त्याचे वडील फहिम शेख आणि संपूर्ण कुटुंबियांनी त्याचे उत्साहात अभिनंदन केले., असून, एवढ्या लहान वयात एवढी जिद्द अशा शब्दांत त्याचे कौतुक केले जात आहे.

जिद्द आणि श्रद्धा असेल तर वयाचं बंधन नसतं, हेच पुन्हा एकदा सिद्ध झालंय आपल्या जालन्यात! जिथे कडाक्याच्या उन्हात मोठ्या माणसांनाही तहान-भूक सहन होत नाही, तिथे आठ वर्षांच्या जैन **पान २ वर**



# संपादकीय पान

## अपप्रवृत्तीमुळे पवित्र सणाला गालबोट लागते

होळी हा आपल्या संस्कृतीतील एक मोठा आणि महत्वाचा सण आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण विविध नावांनी साजरा केला जातो. हा सण होळी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोलायात्रा, कामदहन अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळीच्या दिवशी आपण आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून राख करावे अशी कल्पना आहे. त्यामुळे आपले मन निर्मळ व्हावे अशी अपेक्षा असते. आपल्या मनातील वाईट विचारांना होळी प्रमाणे आगीत जाळून सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करण्याचा हा दिवस. महाराष्ट्रात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कोकणात तर हा सण अधिक मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात मात्र गेल्या काही वर्षात या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे या सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. होळीचा सण साजरा करताना धांगडधिंगा घातला जातो. धुलीवंदनाच्या दिवशी तर एकमेकांना गुलाल लावण्याऐवजी रसायन मिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. काही समाज कंटक पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मरतात. त्यात अनेकजण जखमी होतात. अशा घटनांत यापूर्वी काहींना आपले डोळे गमवावे लागले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. काही महाभाग तर जाणीवपूर्वक महिलांना टार्गेट करतात. काहीजण रंगाऐवजी नासकी अंडी फेकून मारतात. काहीजण तर या दिवशी लाऊस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात. धुलीवंदनच्या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. मद्यपान करून नृत्य करताना बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धुलीवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. मात्र या अपप्रवृत्तीमुळे या सणाला गालबोट लागत आहे. ही अपप्रवृत्ती दूर करून सर्वांनी होळीचा सण साजरा करावा. जे समाज कंटक या पवित्र सणाला गालबोट लावतील त्यांना पोलिसांनी कडक शासन करावे.

## सौदीत ५० हजार मुस्लीम अडकल्याची भीती

**नागपूर** - रमजान काळात उमरा या धार्मिक विधीसाठी महाराष्ट्रातून सौदी अरेबियात गेलेले ५० हजार ते १ लाख मुस्लिम बांधव अडकले असल्याची भीती राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी व्यक्त केली. राज्य अल्पसंख्यांक आयोगाने यासंदर्भात तातडीने हालचाली सुरू करत सर्वांना सुरक्षित परत आणण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. यंदा राज्यातील सुमारे ५०० टूर ऑपरेटर्सनी उमरा या धार्मिक विधीसाठी यात्रेकरूंना पाठवले असून, त्यापैकी केवळ मुंबईतूनच १०० हून अधिक ऑपरेटर्स सक्रिय होते, अशी माहिती समोर आली आहे.

पान १ वरुन

### कृत्रिम बुद्धिमत्ता ...

पुढे म्हणाले की, काम करत असताना अनेक प्रश्न निर्माण होतात. कस्टमर सर्व्हिसमध्ये एआय पॉवर्ड चॅटबॉट्स २४ तास उपलब्ध असतात, ते प्रश्नांची उत्तरं देतात आणि समस्या सोडवतात. पतसंस्थेचा मुख्य व्यवसाय कर्ज वाटप करणे आहे. चांगले ग्राहक ओळखण्यासाठी एआय मॉडेल्स ग्राहकांच्या क्रेडिटवर्थीनेसचे अधिक चांगले मूल्यांकन करतात. त्यामुळे योग्य व्यक्तीला कर्ज वाटत होते. नंतर वसुलीचा ताण येत नाही. एनपीए झिरो झाल्यामुळे संस्था सुरक्षित राहते, असे सांगून वैयक्तिक वित्तीय सल्ला देताना ते म्हणाले की, एआय ग्राहकांच्या व्यवहारांचे विश्लेषण करून व्यक्तिगत वित्तीय सल्ले देता येतात. वाढते सायबर गुन्हे व वित्तीय अनियमितता यासाठी एआय संभाव्य जोखीम ओळखून त्यावर नियंत्रण मिळवण्यात मदत करते. एआयमुळे योग्य प्रकारे जोखीमचे व्यवस्थापन करता येते, असे ते शेवटी म्हणाले.

प्रास्ताविकपर भाषणात डॉ. विठ्ठल पवार यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा पतसंस्थेमध्ये वापर करणे का आवश्यक आहे, यावर सखोल मार्गदर्शन केले. बदलत्या काळानुसार आपण अपडेट आणि अपग्रेड झालो नाही तर प्रवाह बाहेर फेकले जाऊत. तंत्रज्ञान जलद गतीने बदलत आहे आणि बदलणाऱ्या तंत्रज्ञानानुसार आपण जर बदललो नाही आणि संस्थेमध्ये बदललेले तंत्रज्ञान आणले नाही तर या गतिमान जगामध्ये आपण मागे राहू. त्यासाठी हे चर्चासत्र आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले.

या चर्चासत्रात जालना शहरातील सर्व पतसंस्थांनी सहभाग घेतला. आपल्या पतसंस्थेच्या दैनंदिन कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करून घ्यावा, असे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

### जैन फईम शेख ...

फाईम शेख ने १३ तासांचा निर्जळी उपवास करून सर्वांनाच थक्क केलंय.''

''पवित्र रमजानच्या दुसऱ्या दिवशी, फईम शेख यांचा मुलगा जैन शेख याने आपल्या आयुष्यातील अकरावा रोजा मुकम्मल केला. पहाटेच्या सेहरीपासून ते सायंकाळच्या इफ्तारपर्यंत, जैन शेख यांनी पाण्याचा थेंबही न पिता हा रोजा पूर्ण केला. या यशाबद्दल त्याच्या कुटुंबात आनंदाचे वातावरण असून, नातेवाईकांकडून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### 'सुराज्य अभियान'च्या तक्रारीची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून गंभीर दखल

# उजनी धरण जलप्रदूषण प्रकरणी कार्य कृती अहवाल सादर करण्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला आदेश

**सोलापूर । प्रतिनिधी** - जिल्ह्याची जीवनवाहिनी असलेल्या उजनी धरणातील भीषण जलप्रदूषण आणि त्यामुळे निर्माण झालेल्या आरोग्य आणीबाणीची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने () गंभीर दखल घेतली आहे. 'सुराज्य अभियान'ने यासंदर्भात दाखल केलेल्या तक्रारीवरून आयोगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांना नोटीस बजावली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून पुढील दोन आठवड्यांत 'कार्य कृती अहवाल' () सादर करण्याचे कडक निर्देश आयोगाचे सदस्य श्री. प्रियंक कानुनगो यांनी दिले आहेत.

सुराज्य अभियानने आयोगासमोर मांडलेल्या पुराव्यानुसार, उजनीच्या पाण्यात मँगनीजची पातळी २.५६ / आढळली आहे, जी सुरक्षित मर्यादेपेक्षा तब्बल ५१ पटीने जास्त आहे. पुणे आणि सोलापूर शहरांतून दररोज सुमारे ४,२६२ दशलक्ष लिटर प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट धरणात सोडले जात असल्याची धक्कादायक कबुली खुद्द प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालात आहे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या () अहवालानुसार, हे पाणी मानवी वापरासाठी 'अत्यंत असुरक्षित' असून त्यातील टीडीएस () ७०० पर्यंत पोहोचला आहे.

''हे केवळ पर्यावरणीय प्रदूषण नसून संविधानातील कलम २१ अंतर्गत असलेल्या जगण्याच्या अधिकाराचे



उल्लंघन आहे,'' असे सुराज्य अभियानचे महाराष्ट्र राज्य समन्वयक श्री. अभिषेक मुरूकटे यांनी म्हटले आहे. प्रदूषणाचे गंभीर पुरावे असतानाही प्रशासनाने कोणताही आरोग्य इशारा जारी केला नाही किंवा बाधित २८ गावांना पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था केली नाही, हा सार्वजनिक सेवकांचा अक्षम्य हलगर्जीपणा असल्याचे त्यांनी नमूद केले.

सुराज्य अभियानच्या मागणी करण्यात आले आहे की बाधित नागरिकांची तातडीने ब्लड-मेटल स्क्रीनिंग (रक्तातील जड धातूंची तपासणी) करावी. हलगर्जी अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करून वैद्यकीय नुकसानभरपाई निधी स्थापन करावा. बाधित गावांना तातडीने शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करावा. नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण आणि पर्यावरणीय न्यायासाठी सुराज्य अभियान आपला कायदेशीर लढा यापुढेही सुरूच ठेवणार असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# 'होळीचा सण लय भारी'

होळी हा रंगाचा सण आहे अगदी लहान मुलांपासून तर वयस्करांपर्यंत सर्व जणांनी एकत्र येऊन आनंदाने साजरा करण्याचा हा सण आहे.रंगाची उधळण तर असतेच, पण मनातील राग होळीच्या दिवशी आरोळ्या मारुन,ग्रामीण भागात त्याला बोंबा मारून राग व्यक्त करणे म्हणतात. एखाद्याच्या नावाने शिमगा करण्याची प्रथाही या सणात आहे. त्या दिवशी अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करून एक गमतीदार भाग म्हणून स्वीकारला जातो. तरीपण अशाप्रकारे आरोळ्या मारतांना त्या कृतीने आजूबाजूला तणाव निर्माण होईल अशी कृती मात्र व्हायला नको हे बंधन प्रत्येकाने पाळायला हवे. होळीच्या दिवशी आपण बऱ्याच वेळा वर्तमानपत्रात राजकीय सामाजिक कार्य करणाऱ्या लोकांची होली है बुरा न मानो असे म्हणून त्याच्या बोलण्याची किंवा एखाद्या सवयीची मस्करी केली जाते परंतु त्या दिवशी ते माफ असते शक्य तर कोणी मनावर घेतच नाही.

होळी हा सण केवळ रंगांचा उत्सव नसून त्यामागे अनेक पौराणिक कथा आहेत. भगवान श्रीकृष्ण आणि राधा यांच्यातील अलौकिक प्रेमाचे प्रतीक म्हणून हा सण ओळखला जातो. रंगांनी होळी खेळण्याची परंपरा श्रीकृष्णानेच सुरू केल्याचे मानले जाते. दुसरीकडे, भक्त प्रल्हादाला मारण्यासाठी हिरण्यकश्यपूची बहीण होलिका त्याला घेऊन आगीत बसली होती. मात्र, ईश्वरी कृपेने प्रल्हाद वाचला आणि होलिका जळून खाक झाली. हाच संदेश देण्यासाठी दरवर्षी होळी पेटवून वाईट विचारांचा त्याग केला जावा हाच त्यामागील विचार आहे.

आपल्याकडे नवीन वर्षाची सुरुवात गुढीपाडव्याला होते, आणि शेवटचा सण तो होळी चा सण असतो. यावर्षी फाल्गुन पौर्णिमा तिथी २ दिवसांत विभागली गेली आहे. या तिथीचा प्रारंभ २ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजून ५५ मिनिटांनी होईल, तर तिथीची समाप्ती ३ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजून ०७ मिनिटांनी होईल.

काही भाविक २ मार्चच्या रात्रीच होळी दहन करून ४ मार्चला धुलीवंदन साजरे करतील.

पंचांगानुसार, या वर्षी होलिका दहनाचा शुभ काळ २ मार्च रोजी संध्याकाळी ६:२२ ते रात्री ८:५० पर्यंत असेल. या काळात योग्य विधी करून होलिका दहन करणे शुभ आणि फलदायी ठरेल.

जे भाविक ३ मार्चला होळी पेटवणार आहेत, त्यांनी सायंकाळी ७ वाजल्यानंतर, म्हणजेच चंद्रग्रहण संपल्यानंतरच दहन करावे, असा सल्ला दिला जात आहे.

फाल्गुन पौर्णिमेला आपण ''होळी'' सण साजरा करत असतो. त्यालाच हुताशनी पौर्णिमा असेही म्हणतात.होळीचा उत्सव,''होलिकोत्स्वव'' म्हणतात.

आपल्याकडे होळीला शिमगा असेही म्हणता तसेच होरी हा शब्द सुध्दा प्रचलित आहे.

वसंत ऋतूचे आगम झालेलेअसते. वातारणात,नैसर्गिक बदल झालाअसतो.थंडी संपून, उन तापायला सुरूवात झाली असते.उन्हाळ्याची चाहुल लागते.पानगळ सुरु झाली असते.पळसाचे फुले आली असतात. पूर्वीच्या काळी होळीच्या वेळी रंग ओढण्यासाठी पळसाच्या फुलाचा वापर केला जात असे फुलाचा रंग काढून तो लावला जात असे. आयुर्वेदातही पळसाच्या फुलाचे महत्त्व आहे. आंघोळीच्या पाण्यात पळसाचे फुले टाकून आंघोळ केल्यास त्वचारोग नाहीसा होतो असे म्हटले आहे.

उत्तर भारत,दक्षिण भारत,महाराष्ट्रात होळीचा सण हा वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होतो. महाराष्ट्रातील खानदेश, विदर्भ, कोकण, या ठिकाणी सुद्धा वेगवेगळ्या पद्धतीने होळी साजरी करतात. कोकणात होळीचा सण जवळपास पंधरा दिवस साजरा केला जातो तर इतर ठिकाणी होळी पौर्णिमा धुलीवंदन म्हणजेच धुळवड नंतर रंगपंचमी शिमगा असा हा सण वेगळ्या पद्धतीने साजरा होतो.

आपल्याकडे आता होळी पौर्णिमेनंतर दुसऱ्या दिवशी धुलीवंदन म्हणजे धुळवड असते पण त्याच दिवशी युवा मंडळी धुळवड आणि रंगपंचमी साजरी करतात डी.जे लावून होळीचे गाणे लावून नाचतात एकमेकाला रंग लावतात संपूर्ण रंगाने अंग भिजवून घेतात की चेहरे ओळखू येत नाही अशा प्रकारे आनंद व्यक्त करतात.

उत्तर भारतात पुतना राक्षिणीला जाळतात.

तर दक्षिणेस कामदेवाचे दहन करतात.

कोकणात होळीचा उत्सव मोठा असतो. विशेष रत्नागिरी जिल्ह्यात जास्त. तसेच मालवण. तिकडे शिमगो असेही म्हणतात. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीचा हा मुख्य दिवस असतो . ग्रामदेवतेच्या मुख्य मंदिरासमोर पहिला होम लावण्याचा मान असतो, व त्यातील निखारा घेऊन मग गावातील ठिकठिकाणी होळी पेटवली जाते. होळी पौर्णिमा, धुळवड, आणि रंगपंचमी असा हा सण साजरा केला जातो. होळी हा रंगांचा सण समजला जातो. तसेच एकमेकांना रंग लावून रंगपंचमी साजरी केली जाते. तसेच पारंपारिक नृत्य पारंपारिक गाणे यामध्ये साजरे केले जातात वंजारी समाजात होळीला फार महत्त्व आहे. पारंपारिक पोषाख घालून नृत्य करण्याची प्रथा आहे.

म.प्र.त इंदोर, वरती मथूरा,वृंदावन, नंदगाव,ला होळी

विशेष साजरी होते. मथुरा आणि वृंदावन येथील होळी व तिथला उत्साह अवर्णनीय असतो, मथुरा येथील फुलांची होळी ही जग प्रसिद्ध आहे. यासाठी गुलाब, कमळ, चंपा, चमेली, यासारखे फुलांची होळी साजरी केली जाते.

प्रत्येक ठिकाणच्या आख्यायिका वेगवेगळ्या सांगितल्या जातात.

महाराष्ट्रात भक्त प्रल्हादाची गोष्ट सांगितली जाते.हिरण्यकश्यपू हे भक्त प्रल्हादाचे वडिल.ते त्याचा फारच छळ करायचे.प्रल्हादाने विष्णुचे/नारायणाचे नाव घेऊ नाही म्हणून त्याला उंच कड्यावरुन लोटले, उकळत्या तेलाच्या कढईत टाकले, पण त्याला काहीही झाले नाही. म्हणून बहिण हुंडा/होलीका जिला अग्निचे भय नसते.तिला वर लाभला असतो, तिच्या मांडीवर अग्नित प्रल्हादाला बसविले जाते,पण प्रल्हादाला काहीच होत नाही.पण हुंडा जळून जाते.अशी कथा आहे.

अर्थातच वाईट गोष्टींचा नाश व्हावा, दुर्गुणाचा नाश व्हावा हीच त्यामागील भावना आहे.

पूर्वीच्या काळी गावातील प्रमुख चौकात नगारखान्यात होळी पेटवली जात होती. आताही गावातील प्रमुख चौका बरोबरीने, निरनिराळ्या कॉलन्यातून होळी पेटवली जाते.एका खड्ड्यात एरंडाची उंच फांदी रोउन आजूबाजूला शेणाच्या गोवऱ्या रचतात. लाकूड, झाडाच्या वाळलेल्या फांद्या रचतात.हार घालतात.मुख्य होळी पेटवली की तिथून मशाल पेटवून इतर होळी पेटवितात.असा प्रघात आहे.

होळी पेटवलेल्यावर होळीच्या दर्शनासाठी गर्दी होते.स्त्रिया पूजा करतात. पुरण पोळीचा नैवेद्य दाखतात.पुरूषमंडळी नारळ अर्पण करतात.खोबऱ्याची वाटी होळीच्या निखाऱ्यावर भाजून तो प्रसाद वाटतात. सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात. होळीला घरोघरी पुरणपोळी,कटाची आमटी,हे समीकरण ठरले असते.

एकमेकांशी वैर,राग असेल तो होळीत टाकून संबंध सुधारावेत ही भावना असते.

होळी सण साजरा करत असताना वृक्षतोड होणार नाही याची दक्षता घ्यावी वृक्षतोड केल्यास दंडात्मक करावे होऊ शकते याचे भान ठेवावे तसेच त्याच्या गल्लीतील लोक स्वच्छने देतील तेवढे गौऱ्या आणि लाकूड होळी जाण्यासाठी घ्यायला हवे उगीच त्यासाठी वादावादी करू नये. सगळ्यांनी एकत्र येऊन साजरा करण्याचा हा संघ असल्यामुळे अशा गोष्टी घडायला नको जेणेकरून बंधू भावाने व आनंदाने साजरा होईल.

होळीच्या दुसरे दिवशी धुलीवंदन-धुळवड साजरा करतात. तर पाचव्या दिवशी ''रंगपंचमी '' साजरी करतात. सर्वत्र भेदभाव-भांडणे-वैर-विसरुन रंगाची उधळण करतात. पावरा लोकात हा सण मोठ्या प्रमाणात साजरा होतो.बंजारी समाजातही होळी उत्साहाने साजरी होते.

रंगांची उधळण करत असताना तो रंग अपायकारक नसावा, तसेच कोणालाही इच्छा विरूद्ध रंगवू नये. पाणी भरलेल्या फुग्यांचा वापर करू नये शक्यतोवर गुलाल उधळून आनंद व्यक्त करावा पूर्वीच्या काळी पळसाच्या फुलांचा रंग काढून त्याचा वापर केला जायचा आणि त्यामुळे कुठली हानी होत नव्हती. मद्य प्राशन करू नये. या सर्व गोष्टीचे भान ठेवणे महत्त्वाचे आहे.मोठ्या प्रमाणावर भांगही घेत असतात.

होळीचाच भाग रंगपंचमी ला रंग उधळला जातो.राग मानायचा नसतो.म्हणूनच ''बुरा ना मानो होली है''!!

म्हणतात.

अनेक ठिकाणी रंग बरसे...भिगी चुनरिया..,रंग बरसे..

होली.. रे होली..रंगोकी होली...,अशा गाण्यावर धुंद होऊन नाच केला जातो. आनंदोत्सव साजरा करतात.

होलिका ही वाईट प्रवृत्तीची असल्यामुळे तिचा अंतही वाईट पद्धतीनेच झाला. त्यामुळेच वाईट आचार विचारांना बाजूला सारणे संपवणे, मनातील वाईट विचार होळी प्रमाणे अग्नीत जाळून राख करणे, हाच होळी साजरा करणे या मागचा उद्देश आहे. याच दिवशी वाईट विचारांचा व वाईट गोष्टींचा त्याग केला पाहिजे.आज आपण बघतोय एकमेकां विषयी वाईट भावना किती टोकाला पोहचल्या आहेत.एकमेकांच्या विषयी चांगल्या भावना नाही, पदोपदी दुष्मनी आढळते, ती नष्ट होणे आजच्या काळात प्रामुख्याने गरज आहे हे सांगायला नकोच. पूर्वीच्या काळी आपल्या देशात सर्व सणवार बंधूभावानी आणि आनंदाने साजरी केली जात होते.आणि त्या सणांचा आनंद घेतला होता. परंतु आता परिस्थिती बदललेली आहे प्रत्येकाने वेगवेगळ्या प्रकारे आपल्या पद्धतीने सणवार साजरे करायचे ठरवले असे दिसते. राजकीय स्वरूप आले आहे. दहीहंडी गणेशोत्सव दुर्गा उत्सव यावेळी आपणाला असे वेगळेपण जाणवते.

किमान अशा सणवाराचे प्रसंगी तरी सगळे राग रुसवे बाजूला ठेवून एकत्र यायला हवे.आनंद घ्यायला हवा.

होली के दिन दिल खिल जाते है..

रंगो मे रंग मिल जाते है..

गीले शिकवे भूल के दोस्तों..

दुष्मन भी गले लग जाते है..

असा हा होळीचा सण लय भारी..

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मो.८९९९५६६९१७**



# मुलांना मोबाईलचे गुलाम न बनवता ओळखा आणि वेळीच सावरा, त्यांना स्मार्ट बनवा - डॉ. गजानन खरात

## मुलांनी रविवारी फक्त अर्धा तास मोबाईल वापरण्याची शपथ घेतली





**जालना । प्रतिनिधी -** शाळेच्या मुख्याध्यापिका रंजना ठाकरे यांच्या प्रेरणेने ठाकरे किड्स स्कूलमध्ये मोबाईल व्यसनाधीनता आणि अभ्यास विषयावर विशेष पालक सभा संपन्न झाली.

याप्रसंगी डॉ.गजानन खरात सर हे प्रमुख पाहुणे तर अध्यक्ष स्थानी संदिप ठाकरे हे होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रावणी पिसाळ मॅडम यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहणे व व्याख्याते डॉ. गजानन खरात सर यांनी पुढिल प्रमाणे मार्गदर्शन केले, आजच्या डिजिटल युगात मोबाईल हे संवादाचे साधन न राहता ते मुलांसाठी एक व्यसन बनत चालले आहे. मुलांच्या हातातील मोबाईल सोडवून त्यांना अभ्यासाकडे वळवायचे असेल, तर केवळ मुलांना दोष देऊन चालणार नाही, तर पालकांना आपल्या घरातील वातावरण बदलावे लागेल, स्वतः आदर्श बनून मुलांसमोर स्वतःचा स्क्रीन टाईम कमी करावा, असे प्रतिपादन प्रसिद्ध क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट आणि करिअर समुपदेशक डॉ. गजानन खरात जिल्हा ताणतणाव नियंत्रण समितीचे सदस्य यांनी केले. येथील ठाकरे किड्स स्कूलमध्ये आयोजित मुलांचा मोबाईल वापर टाळून अभ्यासास प्रोत्साहित करणे या विषयावरील विशेष पालक मार्गदर्शक सभेत ते बोलत होते. सायंकाळी ६ ते ८ या वेळेत संपन्न झालेल्या या सभेला पालकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

**मोबाईल आणि डोपामाईनचा खेळ**

मार्गदर्शन करताना डॉ. खरात यांनी मुलांच्या मेंदूवर होणाऱ्या परिणामांची मानसशास्त्रीय माहिती दिली. ते म्हणाले की, ''मोबाईलवर गेम्स खेळताना किंवा रिल्स पाहताना मुलांच्या मेंदूतून डोपामाईन नावाचे रसायन स्रवते, जे त्यांना त्वरित आनंद देते. यामुळे मुलांना अभ्यासासारख्या संथ पण शाश्वत गोष्टी कंटाळवाण्या वाटू लागतात. हे टाळण्यासाठी पालकांनी मुलांना डिजिटल बेबीसिटर म्हणून मोबाईल देणे थांबवले पाहिजे.''

**पालक की घरातील वातावरण?**

यावेळी त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला की, मुलांच्या या सवयीला केवळ पालकच नाही, तर घरातील संवादहीन वातावरण जबाबदार आहे. मुले ऐकून कमी आणि पालकांना बघून जास्त शिकतात. जर पालक स्वतः मुलांसमोर सतत मोबाईल वापरत असतील, तर मुले त्याचेच अनुकरण करणार. त्यामुळे घरात नो-स्क्रीन झोन तयार करा आणि जेवताना व झोपताना मोबाईल पूर्णपणे बंद ठेवा, असा सल्ला त्यांनी पालकांना दिला.

**शिक्षक आणि पालकांचा समन्वय गरजेचा**

विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शिक्षक आणि पालक ही एकाच रथाची दोन चाके आहेत. शिक्षकांनी अभ्यासाला रंजक बनवणे आणि पालकांनी घरात अभ्यासासाठी पूरक वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. घरात गोष्टीची पुस्तके, बैठे खेळ , छंद जोपासणे, मुलांच्या छोट्या यशाचे ही कौतुक करणे, ज्यामुळे त्यांना अभ्यासाची गोडी लागेल, असेही डॉ. खरात यांनी नमूद केले.

पालकांसोबत केलेल्या सर्वे नुसार मोबाइल वापराचा मुलांच्या शारीरिक आरोग्यावर चिडचिडेपणा रागावणे ५३% चित्त एकाग्र न होणे ३३%, डोळ्यांच्या समस्या २३%, अभ्यासात लक्ष न लागणे ५३%, झोप न येणे उशिरापर्यंत झोपणे २३% मुलांवर परिणाम झाला आहे हे निदर्शनास आले आहे. ४ तासात पर्यंत मोबाईल बघणारे मुले ही ३% टक्के आढळून आले आहे.ते रिस्क झोन मध्ये आहेत.

मोबाईल रिस्क कमी करण्यासाठी उपाय सुचवताना त्यांनी नो स्क्रीन झोन ऐवजी स्टडी झोन तयार करावा. दैनंदिन वेळापत्रक ठरवून त्यानुसार अभ्यासाला बसणे, पुस्तक वाचणे छोटी छोटी ध्येय ठरवणे बैठी खेळ खेळणे आऊटडोअर गेम साठी जाणे , निसर्गाच्या सानिध्यात जाऊन येणे बाग बगीचे प्रेक्षणीय स्थळे यांना भेट देणे, तंत्रज्ञानाचा स्मार्ट वापर करा, नातेवाईकांना भेटण्यासाठी जाणे. दिवसभरातील किमान अर्धा तास कॉलिटी टाईम मुलांना द्या त्यात निवांत गप्पा मारा त्यांच्या भावना समजून घ्या. असा सल्ला डॉ. गजानन खरात यांनी दिला

कार्यक्रमाच्या शेवटि मुलांनी रविवारी फक्त अर्धा तास मोबाईल वापरण्याची शपथ घेतली.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात पालकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना डॉ. खरात यांनी शंका समाधान केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रंजना ठाकरे व राजश्री माचेवार, स्मिता टाकाळकर, माधुरी नामदे, मोनिका शहाणे, प्रतिक्षा कनकुटे, रसिका दिक्षित, आदिती लोळगे, वैष्णवी पोटाबत्तीन, श्रावणी पिसाळ, शीला राऊत व संजीवनी सोनवणे इत्यादि शिक्षक वृंद परिश्रम घेतले.

मोठ्या संख्येने पालक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन शाळेच्या वतीने करण्यात आले.

## सुदर्शन सोळंके यांची शिवसेना परतुर तालुका पदी पुनर्नियुक्ती

### शिवसेना नेते ना संजय राठोड यांनी दिले नियुक्ती पत्र



**परतुर । प्रतिनिधी -** शिवसेना चळवळीतील जुने कार्यकर्ते व तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके यांची पुन्हा एकदा परत तालुका शिवसेना प्रमुख पदी निवड करण्यात आली याबाबत शिवसेना नेते जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते नियुक्तीपत्रक देऊन सदर निवड घोषित करण्यात आली यावेळी शिवसेना आमदार हिकमत उढाण जिल्हा जालना प्रमुख ए जे बोराडे व प्रल्हाद बोराडे किसन तात्या मोरे अमोल सुरुंग कोयरे सर पप्पू भय्या दयमां रामजी खवल यांच्यासह वरिष्ठ नेत्यांची मुख्य उपस्थिती होती.

दिलेल्या नियुक्तीपत्रकात वरिष्ठांच्या वतीने असे सांगितले की तळागाळापर्यंत शिवसेनेची विचारधारा पोहोचवत स्वर्गवासी बाळासाहेब ठाकरे व स्वर्गवासी आनंद दिघे यांच्या विचार सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे काम या या पदाच्या माध्यमातून करावा व शिवसेनेची मोठी फळी निर्माण करत गाव तेथे शिवसैनिक निर्माण करत शिवसेना चळवळ बळकट करावी अशा पत्रकाच्या माध्यमातून संजय मोरे यांनी सुदर्शन सोळंके यांना शुभेच्छा व्यक्त केल्या आहे.

याबाबत आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना सुदर्शन सोळंके यांनी सदरील पद गेल्या अनेक वर्षापासून मी सांभाळत असून परतुर मतदारसंघात शिवसेनेच्या व नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या विचारांचा शिवसैनिक घडवण्यासाठी मी अहोरात्र प्रयत्न करत आलो असून शिवसेनेची मोठी फळी या कार्यक्षेत्रात वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली मी निर्माण केले आहे माझ्या या कार्याची दखल म्हणून पुन्हा एकदा सदरील पदाची जबाबदारी आपल्यावर आली असून निश्चित या पदाच्या माध्यमातून वरिष्ठ नेत्यांना अपेक्षित असलेली शिवसेना चळवळ व शिवसेनेचा झंजावात या तालुक्यात निर्माण करेल अशी ग्वाही नवनिर्वाचित तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके यांनी दिली या कामात सर्व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्यांना व शिवसैनिकांना सोबत घेऊन आपण कार्य करणार असल्याचे अभिवचन त्यांनी यावेळी दिले. या निवडी बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होताना दिसत आहे.

## मोहम्मद कैफ चा पहीला रोजा

**विशाल देशमुख**



**टेंभुर्णी -** येथील राहीवासी शेख नासिर शेख फारुख यांचा मुलगा मोहम्मद कैफ वय ७ वर्ष या चिमुखल्याने आपल्या जीवनातील पवित्र रमजान महिन्यात रोजा (उपास ) पूर्ण केल्या बद्दल त्याचे वडील शेख नासिर शेख फारुख शेख बशीर, पीसीएमचे तालुका अध्यक्ष शेख अशफाक, शेख मुस्ताक शेख अन्सार शेख फरहान शेख इब्राहिम शेख माझं शेख हसनैन आदींनी अभिनंदन व कौतुक केले




# भाजपा हा कार्यकर्त्यांच्या श्रम, समर्पण आणि त्यागावर उभा असलेला पक्ष - आमदार बबनराव लोणीकर

## प्रशिक्षणातून संघटन बळकट करण्याचा निर्धार पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियानाच्या जिल्हा कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पक्षाच्या संघटन विस्ताराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियानाच्या जिल्हा कार्यशाळेला आज उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भाजपा जिल्हा कार्यालयात पार पडलेल्या या कार्यशाळेत आगामी महाभियानाचे नियोजन, कार्यपद्धती, प्रशिक्षणाचा आराखडा आणि संघटन मजबुतीचा रोडमॅप यावर सखोल चर्चा करण्यात आली. कार्यशाळेला माजी मंत्री व आमदार बबनराव लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी मराठवाडा अभियान प्रमुख मनोज पांगारकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन भाजपा जालना महानगरचे जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले होते. कार्यशाळेच्या सुरुवातीला प्रशिक्षण महाभियानाच्या उद्देशावर सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्षाच्या विचारधारेची स्पष्ट समज, संघटन कौशल्याची वाढ, निवडणूक व्यवस्थापनातील प्रशिक्षण आणि समाजाशी प्रभावी संवाद साधण्यासाठी कार्यकर्त्यांना सक्षम करणे हा या महाभियानाचा मुख्य हेतू असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले. तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पक्षाचे ध्येय-धोरण पोहोचवून त्यांना नेतृत्वक्षम बनवणे, तसेच बूथ स्तरापासून जिल्हा स्तरापर्यंत संघटन अधिक मजबूत करणे हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू असल्याचे यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी आवर्जून नमूद केले. कार्यकर्त्यांना संबोधित करताना आमदार लोणीकर यांनी अभ्यासपूर्ण भाषण केले. त्यांनी भारतीय जनता पक्ष स्थापना (१९८० ) आजपर्यंतचा प्रवास, पक्षाच्या वाढीतील संघर्ष, तसेच विचारसरणीची वैशिष्ट्ये यांचा सविस्तर आढावा घेतला. पक्ष हा व्यक्तीपेक्षा विचारावर चालतो, ही परंपरा कायम राखत कार्यकर्त्यांनी संघटनाशी निष्ठा ठेवून काम करावे, असे त्यांनी आवाहन केले. ''भाजपा हा कार्यकर्त्यांच्या श्रम, समर्पण आणि त्यागावर उभा असलेला पक्ष आहे. येथे प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा आधारस्तंभ आहे,'' असे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले. या वेळी पक्ष उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अनेक नेत्यांच्या योगदानाचा आपल्या भाषणात आमदार बबनराव लोणीकर यांनी उल्लेख केला. त्यांनी अटल बिहारी वाजपेयी यांचे सर्वसमावेशक नेतृत्व, लालकृष्ण अडवाणी यांचे संघटन कौशल्य, प्रमोद महाजन यांचे आधुनिक राजकीय व्यवस्थापन, गोपीनाथ मुंडे यांचे ग्रामीण जनाधार, तसेच दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानववादाच्या विचारांचा विशेष उल्लेख केला. यासोबतच कुशाभाऊ ठाकरे, श्यामाप्रसाद मुखर्जी आणि रामभाऊ म्हाळगी* यांच्या संघटन बांधणीतील योगदानाचेही त्यांनी स्मरण केले. पुढे बोलताना आमदार लोणीकरांनी दोन खासदार ०२ खासदारा पासून सुरू झालेला पक्षाचा प्रवास ३०० पर्यंत गेला असल्याचे सांगत देशातील सतरा राज्यांमध्ये सहकारी घटक पक्षांसह सरकारे असल्याचे सांगतानाच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने केलेली प्रगती, पायाभूत सुविधा, डिजिटल परिवर्तन, गरीब कल्याण योजना आणि जागतिक स्तरावर भारताची वाढती प्रतिष्ठा याचा त्यांनी उल्लेख आमदार बबनराव लोणीकर यांनी केला. तसेच पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात राबविण्यात आलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्प, गुंतवणूक, कृषी व शहरी विकास योजना यामुळे राज्याच्या विकासाला गती मिळाल्याचे त्यांनी सांगितले. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी संघटन विस्ताराला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन करत आमदार लोणीकर म्हणाले की, प्रशिक्षण महाभियानातून तयार होणारे प्रशिक्षित कार्यकर्तेच निवडणुकीत विजयाचा पाया ठरतील. बूथ व्यवस्थापन, मतदारांशी सातत्यपूर्ण संपर्क, स्थानिक प्रश्नांवर अभ्यासपूर्ण भूमिका आणि सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर या चार




घटकांवर विशेष भर देण्याचे त्यांनी सांगितले. भाजपा हा लोकशाही तत्वांना बांधील पक्ष असून येथे पदापेक्षा कार्याला महत्त्व दिले जाते, असे नमूद करत ''या पक्षात कोणीही मालक नाही; हा पक्ष सर्व कार्यकर्त्यांचा आहे,'' असा ठाम संदेश यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला. कार्यशाळेला जिल्हाभरातील पदाधिकारी, मंडळ प्रमुख, मोर्चा पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. प्रश्नोत्तर सत्रात अनेकांनी संघटन विस्तार, प्रशिक्षण पद्धती आणि निवडणूक नियोजनाबाबत प्रश्न विचारले. कार्यशाळेच्या शेवटी आगामी प्रशिक्षण सत्रांचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आणि सर्वांनी संघटन मजबूत करण्याचा संकल्प केला. एकूणच, संघटन कौशल्य वाढवणे, विचारधारा दृढ करणे आणि निवडणूक तयारी अधिक प्रभावी करणे या तीन प्रमुख उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ही कार्यशाळा महत्त्वाची ठरल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली. पक्षाच्या आगामी वाटचालीसाठी ही कार्यशाळा मार्गदर्शक ठरणार असून तळागाळातील कार्यकर्त्यांना नवे बळ देणारी ठरली. याप्रसंगी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष भास्करआबा दानवे, जालना महापौर वंदनाताई मगरे, जालना उपमहापौर राजेश राऊत, रामेश्वर पाटील भांदर्गे, बद्रीनारायण पठाडे, विश्वजित खरात, शिवाजी बापू थोटे, अनिल कोलते, अक्षय गोरंट्याल, अनिलराव कोलते, सुनील पवार, गोविंद ढेंबरे, धनराज काबलीये यांच्यासह जिल्हाभरातील भारतीय जनता पक्षाच्या हजारो प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती यावेळी होती.

# ठाकरे किड्स स्कुल येथे राष्ट्रिय विज्ञान दिन संपन्न




**जालना । प्रतिनिधी -** चंद्रशेखर वेंकट रमन यांच्या जयंती निमित्त राष्ट्रिय विज्ञान दिन साजरा केला जातो. आझाद मैदान परिसरातील ठाकरे किड्स स्कुल येथे राष्ट्रिय विज्ञान दिनानिमित्त सायन्स एक्झिबिशन (विज्ञान प्रदर्श ) आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सिंग्मा केमेस्ट्रि व एक्सलन्स चे संचालक शैलेश ठक्कर होते तर अध्यक्ष संदिप ठाकरे होते. सुत्रसंचालन श्रावणी पिसाळ यांनी केले. या सायन्स एक्झिबीशन चे थीम *प्लांटस क्रॉपस ठेवण्यात आले होते, या प्रसंगी विद्यार्थांनी ३० वेगवेगळे प्रयोग सादर केले यामध्ये पार्टस ऑफ प्लांटस, प्लांटस निड लाईट, टाईपस ऑफ लिव्हज, युझेस ऑफ प्लांट, पार्टस ऑफ लिव्हज, पार्टस ऑफ फ्लावर, मेडिशीनल प्लांट, थिंग्ज वुई गेट, सेव्ह फॉरेस्ट सेव्ह लाईफ, टाईप्स ऑफ फ्लावर्स, फुड वुई गेट फ्राम प्लांटस, फुड ऑफ प्लांटस, ट्रेकिंग केअर ऑफ प्लांटस, ॲग्रिकल्चर वर्किंग, स्प्राउटस, एक्सक्रेशन ऑफ प्लांट, ट्रांन्स्पिरेशन इन प्लॉटस, रेडिकल ॲन्ड प्लिमुल, फोटो सिन्थेसिस, प्लांट सेल्स, सायंटिफिक नेमस व्हेजिटेबल ॲन्ड फ्लावर्स, टाईप्स ऑफ प्लॉटस, सॉइल फॉर प्लांटस, वाटरिंग प्लांटस, ऑरगॅनिक फार्मिंग, सिड्स जर्मिनेशन अशा वेगवेगळया विषयांवर प्रयोग करण्यात आले.

प्रमुख पाहुणे शैलेश ठक्कर यांनी प्रयोग एवढ्या लहान वयात मुलांचे मोठ्या वर्गांचे प्रयोगाचे सादरीकरण पाहुन कौतुक केले.

तर विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणुन प्रत्येक वर्गातील विद्यार्थी समुहाचे प्रथम, व्दितीय व तुतीयतीत क्रमांक हि काढण्यात आले

या सायन्स एक्झिबीशनसाठि मुख्याध्यापिका रंजना ठाकरे यांची प्रेरणा होती व या प्रयोगांसाठी विज्ञान विषयाच्या शिक्षिका प्रतिक्षा कनकुटे व वैष्णवी पोटाबत्तीन या शिक्षकांचे विद्यार्थांना मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजश्री माचेवार, स्मिता टाकाळकर, रसिका दिक्षित, आदिती लोळगे, श्रावणी पिसाळ, माधुरी नामदे, मोनिका शहाणे, गीता खंदारकर, संजीवणी सोनवणे, शीला राऊत यांनी प्रयत्न केले.

# संस्कृती व संस्कारांचे जतन करणे हे महिलांचे आद्यकर्तव्य - स्मिता चेचानी

## मारवाडी महिला संमेलनच्या जिल्हा कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक संघटनांचे मुख्य कार्य आपल्या समाजातील नीती-नियम, संस्कृती आणि संस्कारांचे जतन करणे हे आहे. सध्याच्या पिढीमध्ये संयम आणि विचार करण्याची ताकद रुजवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. जीवनात शिस्तीला अनन्यसाधारण महत्त्व असून, वेळेचे नियोजन करणे ही काळाची गरज आहे. मुले आणि पालकांनीही मोबाईल व रीलसच्या आहारी न जाता आपल्या कुटुंबावर आणि नात्यांवर अधिक लक्ष दिले पाहिजे, असा मौलिक सल्ला मारवाडी महिला संमेलनच्या माजी राष्ट्रीय अध्यक्ष स्मिता चेचानी यांनी येथे बोलताना दिला.

जालना जिल्हा मारवाडी महिला संमेलनाच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा २८ फेब्रुवारी रोजी हॉटेल सेफ्रॉनमध्ये उत्साहात पार पडला, त्यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना स्मिता चेचानी बोलत होत्या. सामाजिक बांधिलकी आणि कौटुंबिक मूल्यांवर विशेष भर देताना त्या म्हणाल्या की, मुलांमध्ये भावनांचे संबंध आणि कर्तव्याची जाणीव करून देण्यात आईची भूमिका महत्त्वाची असून, आईने आधी कुटुंबाला वेळ देऊन नंतर सामाजिक कार्यात योगदान द्यावे.

प्रारंभी मावळत्या अध्यक्षा सावित्रीदेवी मल्लावत यांनी नूतन अध्यक्षा तारा शर्मा, स्मिता चेचानी यांनी सचिव श्रद्धा लोहिया यांना तर कविता पित्ती यांनी कोषाध्यक्षा गीता



पोरवाल यांना पदभाराच्या पिन लावून जबाबदारी सोपवली. यासोबतच उपाध्यक्ष दिपाली सुराणा, अनिता बंसल, शारदा बरलोटा, सहसचिव सुषमा शर्मा, सरला अजित गोलेच्छा, सहकोषाध्यक्ष संगीता तंबाखूवाला, कार्यकारिणी सदस्य शोभा देवीदान, चंदा करवा, सुनिता मालपाणी, मधु भक्कड, पुनम अग्रवाल, डॉ. अर्चना काबरा, सविता लोया, मीना बजाज, कविता पित्ती, नीता बगडिया, उमा पित्ती, श्रद्धा बरलोटा, उमा गिलडा, सरोज दुधानी, निर्मला तापडिया (बदनापूर) जयश्री सोडाणी (अंबड) आणि शिल्पा अग्रवाल (तीर्थपुरी) यांचा पदग्रहण सोहळा पार पडला. यावेळी मारवाडी समाजातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मारवाडी महिला संमेलनच्या राष्ट्रीय अध्यक्षा राजकुमारी बालदी (उज्जैन), प्रदेश अध्यक्ष राखी मालानी (नागपूर) आणि प्रदेश सचिव भारती राठी (भुसावळ) यांनी नूतन कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या. राजकुमारी बालदी यांनी चाइल्ड आणि वूमन सायकॉलॉजीवर भर देत महिलांनी सक्षम व मनाने खंबीर बनण्याचा सल्ला दिला.

# लालबहादूर शास्त्री आष्टी विद्यालयातील विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक शिक्षकांकडून कौतुक

## ८२ पैकी ६२ विद्यार्थ्यांनी मिळवले यश

**आष्टी । प्रतिनिधी -** लालबहादूर शास्त्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आष्टी येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती () २०२५-२०२६ इयत्ता ८ वी (आठवी ) या परीक्षेत या वर्षी विद्यार्थ्यांनी घवघवीत ( रेकॉर्ड ब्रेक ) निकाल लागलेला आहे. शाळेतील एकूण ८२ मुलं या परीक्षेला बसलेले होते त्यापैकी ६२ विद्यार्थी यशस्वी ठरलेले आहेत. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य राजेश नवल सर, पर्यवेक्षक श्री धोंडगे सर, कामठे सर,गायकवाड सर प्रमुख पाहुणे म्हणून पि. डी. सोळंके, श्री रायकर सर. ढाकणे सर, श्री मोरे सर, पालक प्रतिनिधी खवल नाना विद्यार्थ्याचे हार पुष्पगुच्छ व ट्रॉफी देऊन स्वागत केले व तसेच वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेसंदर्भातील महत्त्वाचे मार्गदर्शन केले व सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या .

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डी.एम.मोरे सर यांनी केले तर सूत्रसंचालन श्री शेळके सर यांनी केले, आभार प्रदर्शन मोहन सोळंके सर यांनी संपन्न केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

# महात्मा फुले महाविद्यालयात युवा उद्योजक विद्यार्थी परिसंवाद संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २० व २१ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वा युवा उद्योजक व विद्यार्थी यांच्यामध्ये परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यामध्ये दि. २० रोजी मा. श्री. विश्वभूषण गायकवाड (फाउंडर अँड डायरेक्टर, - टास्क अकॅडमी पुणे) यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला तर दि. २१ रोजी बांबू व्यावसायिक मा. श्री. योगेश शिंदे (सोशल आंतरप्रिनर, पुणे) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी अध्यक्षस्थानी मा. श्री नितीन अग्रवाल (मॅनेजिंग डायरेक्टर, विजय लक्ष्मी स्टील, पुणे) हे होते तर याप्रसंगी मा. श्री. सचिन बन्सल (प्रेसिडेंट, सीए असोसिएशन, पुणे) यांनीही मुलांना उद्योजकतेचा काही टिप्स दिल्या. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. प्रो. डॉ. पांडुरंग भोसले यांचे मार्गदर्शन लाभले, तर कार्यक्रमाच्या वेळी तीनही विद्याशाखांचे उपप्राचार्य प्रो. डॉ. सुहास निंबाळकर, प्रो. डॉ कामयानी सुर्वे, प्रो.डॉ. संगीता अहिवळे, चे समन्वयक डॉ. नीलकंठ डहाळे, रयत शिक्षण संस्थेचे अजीव सदस्य प्रो. डॉ. दत्तात्रय हिंगणे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## जालना वकील संघ निवडणूक

# एक बार, एक मत नियमामुळे दुहेरी सदस्यत्व असलेल्या वकिलांना मतदानापासून दूर राहण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, अंबड, घनसावंगी, जाफराबाद, परतूर आणि भोकरदन या तालुक्यांमधून अनेक वकिलांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तथापि, सर्वोच्च न्यायालयाच्या एक बार, एक मत या महत्त्वपूर्ण नियमामुळे, ज्या वकिलांची नावे एकापेक्षा जास्त वकील संघांमध्ये मतदार म्हणून नोंदणीकृत आहेत, त्यांच्या पात्रतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर, अध्यक्षपदाचे उमेदवार ॲड. महेश धन्नावत यांनी दुहेरी सदस्यत्व असलेल्या वकिलांना मतदानापासून स्वतःला परावृत्त करण्याचे आवाहन केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सुप्रीम कोर्ट बार असोसिएशन विरुद्ध बी.डी. कौशिक यांसारख्या प्रकरणांमध्ये एक बार, एक मत या तत्त्वाची कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या नियमाचा मुख्य उद्देश वकील संघांच्या निवडणुकांमध्ये पारदर्शकता आणणे, गैरप्रकार टाळणे आणि केवळ संबंधित न्यायालयात नियमितपणे सराव करणाऱ्या वकिलांनाच मतदानाचा आणि निवडणुकीत उभे राहण्याचा हक्क देणे हा आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियाशी संलग्न असलेल्या देशातील सर्व वकील संघांना हा नियम बंधनकारक आहे. या नियमानुसार, कोणताही वकील केवळ एकाच वकील संघाच्या निवडणुकीत मतदान करू शकतो किंवा निवडणूक लढवू शकतो, जरी तो एकापेक्षा जास्त वकील संघांचा सदस्य असला तरीही. त्यामुळे, जालना जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीत उमेदवारी दाखल केलेल्या किंवा मतदार असलेल्या ज्या वकिलांची नावे इतर तालुका वकील संघांच्या मतदार यादीतही समाविष्ट आहेत, त्यांच्यावर छाननी प्रक्रियेदरम्यान अपात्रतेची कारवाई होऊ शकते.

या संदर्भात बोलताना अध्यक्षपदाचे उमेदवार ॲड. महेश धन्नावत म्हणाले, ''सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करणे हे प्रत्येक वकिलाचे कर्तव्य आहे. एक बार, एक मत नियमाचे उल्लंघन करणे म्हणजे न्यायालयाच्या आदेशाचा अवमान ठरू शकतो. त्यामुळे, ज्या वकील बांधवांची नावे जालना जिल्हा वकील संघासोबतच इतर कोणत्याही तालुका वकील संघाच्या मतदार यादीत आहेत, त्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून आणि संभाव्य कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी स्वतःहून मतदानापासून दूर राहावे.'' निवडणूक अधिकाऱ्यांकडून आता सर्व उमेदवारांच्या सदस्यत्वाची आणि मतदार यादीतील नावांची सखोल छाननी केली जाणार आहे. या प्रक्रियेत दुहेरी सदस्यत्व आढळल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज रद्द केला जाऊ शकतो. इतकेच नव्हे, तर नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वकिलांना न्यायालयाच्या अवमानाची कारवाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. या कठोर भूमिकेमुळे अनेक उमेदवारांमध्ये चिंतेचे वातावरण असून, छाननी समितीच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यानंतरच निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.